पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• वर्ष १ ले • अंक : ५ • जानेवारी २००८ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

## विविध क्रीडा स्पर्धांचे शानदार उद्घाटन

कामगार कल्याण निधीच्या विहित उद्देशानुसार सन २००७-०८ या आर्थिक वर्षामध्ये सभासद सेवकांमधील कलागुणांना वाव देवून परस्परांमध्ये समन्वय साधण्यासाठी दिनांक २६ ते ३० डिसेंबर ०७ या कालावधीत विविध क्रीडा स्पर्धांचे (क्रिकेट, व्हॉलिबॉल, कबड्डी, बुध्दिबळ, कॅरम, जलतरण, कुस्ती, १०० मिटर धावणे, लांब उडी, थ्रो बॉल, संगित खुर्ची व टेबल टेनिस) आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा स्पर्धांचा उद्घाटन समारंभ



दिनांक २६/१२/०७ रोजी सकाळी ९ वाजता पं.नेहरु स्टेडियम येथे आयोजित करण्यात आला होता. या उद्घाटन समारंभामध्ये विविध क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी झालेले सर्व खेळाडू उपस्थित होते. या क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून मा. शांताराम जाधव, अर्जुन पुरस्कार विजेते (कबड्डी) हे उपस्थित होते. तसेच मा. सुभाष पुरी, व्यवस्थापक, पं.नेहरु स्टेडियम यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. नंदकिशोर जगताप, सचिव, कामगार कल्याण निधी यांनी केले. उद्घाटनपर मार्गदर्शनामध्ये शारिरीक आणि मानसिक आरोग्य सदृढ ठेवून कामकाजातील गुणवत्ता वाढविण्यासाठी खेळ हे महत्वाचे साधन आहे. तसेच, कोणत्याही खेळाने खेळाडूमध्ये एकाग्रता व कार्यक्षमता वाढीस मोठ्या प्रमाणावर मदत होते. त्यामुळे जास्तीत जास्त सेवक/अधिकारी यांनी खेळामध्ये सहभागी व्हावे, असे मा. जाधव यांनी स्पष्ट केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मनपा भवन आणि पाणीपुरवठा/फायरब्रिगेड यांच्यातील क्रिकेट सामन्याची नाणेफेक करुन सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. लीलाधर वाबळे यांनी केले. तर आभार कामगार कल्याण अधिकारी श्री. शिवाजी दौंडकर यांनी मानले.

## सेवानिवृत्त सेवक दिन

पुणे महानगरपालिके तर्फे प्रतिवर्षी वर्षाच्या शेवटच्या रविवारी सेवानिवृत्त सेवक दिनानिमित्त शहरातील सर्व सेवानिवृत्तांसाठी चहापानाचा



कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. या वर्षी दिनांक ३०/१२/०७ रोजी सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना श्री.नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांनी निवृत्तांसाठी वैद्यकीय सहाय्य योजना राबवून पुणे मनपा तहहयात निवृत्तांबरोबर आहे, असे स्पष्ट केले. त्यानंतर श्री.लोकुर, अध्यक्ष, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन यांच्यासह सर्वश्री. नाईक, गोडबोले, निसळ, इंगळे, बोधे, कुलकर्णी आणि देशमुख यांनी निवृत्ती वेतन दशा आणि दिशा या अनुषंगाने आपले विचार मांडले. मा.महापौर यांनी आपल्या भाषणात पुणे शहर हे सेवानिवृत्तांचे शहर म्हणून प्रसिध्द आहे. त्यांनीच शहराचा सांस्कृतिक वारसा जपला आहे. ते निवृत्त झाले असतील तथापि, माझ्या दृष्टीने ते खऱ्या अर्थाने समाज प्रबोधनासाठी सेवाप्रवृत्त झाले आहेत असे आम्ही म्हणू. मनपाने प्रशासनाने लोकसहभाग ही संकल्पना राबविली आहे. निवृत्तांनी त्यांच्या प्रदीर्घ आणि सखोल अनुभव व ज्ञानाद्वारे शहरास सतत भिष्माचार्यांच्या भूमिकेतून मार्गदर्शन करुन पुणे शहरास जो आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त झाला आहे तो उत्तरोत्तर वाढीस लावण्यासाठी सहकार्य करावे. आपल्या प्रत्येक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आम्ही कटिबध्द असून, सातत्याने आपल्याबरोबर आहोत, असे बहुमुल्य विचार प्रकट केले. अंतिमत: पुणे महानगरपालिका सेवानिवृत्त सेवक संघातर्फे प्रतिवर्षी एलएसजीडी परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या सेवकास कै.द.दा.ओरपे यांच्या नावे देण्यात येणारा पुरस्कार या वर्षी शिक्षणमंडळातील सेवक श्री.समिर मानकर यांना ओरपे कुटुंबियांच्या उपस्थितीत मा.महापौर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसेच, श्री.चंद्रकांत शितोळे, सिनिअर ऑडिटर, पुणे मनपा हे डिप्लोमा इन लोकल गव्हर्नमेंट फायनान्शियल मॅनेजमेंट या परीक्षेमध्ये प्रथम क्रमांकाने विशेष श्रेणीत उत्तीर्ण झाल्याने त्यांचाही सत्कार करण्यात आला. श्री. विठ्ठलराव शेटे यांनी आभार प्रदर्शन केले.

## कार्यक्षम अधिकारी पुरस्कार



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या पत्रकारदिनी दि. ६/१/०८ रोजी विशेष कार्य केलेल्या मान्यवर, पत्रकार व लोकप्रतिनिधींचा खास पुरस्कार देवून गौरव करण्यात आला. त्यामध्ये कार्यक्षम अधिकारी म्हणून मनपाचे उप आयुक्त श्री. ज्ञानेश्वर मोळक यांची निवड करुन मा.राज ठाकरे, अध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांचे हस्ते विशेष पुरस्कार देण्यात आला. हा कार्यक्रम स्टार माझा वृत्तवाहिनीचे संपादक श्री.राजीव खांडेकर आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य अध्यक्ष श्री.संजय भोकरे यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. श्री.मोळक यांचे वरील पुरस्काराप्रित्यर्थ हार्दिक अभिनंदन.

## बुध्दिबळ स्पर्धेत अंध सेवक पंकज बेंद्रे सर्वोत्तम

कामगार कल्याण निधींतर्गत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवांतर्गत दिनांक २७ व २८ डिसेंबर, ०७ रोजी पं. नेहरु स्टेडियम येथे बुध्दिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विविध विभागाकडील एकूण १६ सेवकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ दिनांक २७/१२/०७ रोजी सकाळी ९ वाजता ग्रँड मास्टर अभिजित कुंटे आणि ग्रँड मास्टर स्वाती घाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. ग्रँड मास्टर मा.अभिजित कुंटे व स्वाती घाटे यांनी सहभागी स्पर्धकांबरोबर स्वत: खेळून स्पर्धेस सुरुवात केली. विविध स्पर्धांमध्ये अजिंक्यपद मिळवून ग्रँड मास्टर पदवी प्राप्त केलेल्या राष्ट्रीय



दर्जाचे खेळाडू उपस्थित असल्यामुळे सहभागी स्पर्धकांचा उत्साह द्विगुणित झाला. तसेच, त्यांना स्पर्धेमध्ये चांगले कसब दाखविण्यास प्रोत्साहन मिळाले. या स्पर्धेमध्ये स्वारगेट पाणीपुरवठा विभागाकडील अंध सेवक श्री. पंकज बेंद्रे यांनी विजेतेपद मिळविले तर हडपसर क्षेत्रीय कार्यालयाकडील श्री.अरविंद चव्हाण यांना उपविजेतेपद प्राप्त झाले.

### सभासदांसाठी...

कामगार कल्याण निधीची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दि.२२.२.२००८ रोजी आंबेडकर भवन येथे सकाळी ११.३० वा आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित रहावे, ही विनंती.

सचिव अध्यक्ष

पुणे म.न.पा.कामगार कल्याण निधी

संपादकीय...

## कामगार कल्याण

उत्पादन आणि सेवा क्षेत्रात मानव, अर्थ, साहित्य/कच्चा माल आणि यंत्रसामग्री हे ४ प्रमुख घटक (4 M-Men, Money, Material & Machine) आहेत. यातील क्र. ३ साहित्य/कच्चा माल निसर्गाकडून मिळतो. काही वेळा मानवनिर्मितही असतो. मात्र अर्थ व यंत्र हे पूर्णपणे मानवनिर्मित आहे. तथापि, मनुष्यबळ ही एक निसर्गदत्त उर्जा आहे. ती या क्षेत्रात प्रमुख आणि मूलभूत आहे, हे कोणीही नाकारु शकणार नाही. निसर्ग आणि निसर्गदत्त बुध्दिमत्ता या दोन घटकांच्या सहाय्याने मानव आपला आणि जगाचा उत्कर्ष करीत असतो. त्यामुळे जगाच्या उत्कर्षामध्ये मानवाचे अनन्यसाधारण महत्व आहे. त्या दृष्टीकोनातून मनुष्यबळाकडे पाहिले पाहिजे. भारताची लोकसंख्या जास्त आहे. याचा बाउ न करता ह्या मनुष्यबळाचा आणि विशेषत: त्यातील तरुणांमधील उर्जेचा बलस्थान म्हणून उपयोग करा असे ठाम प्रतिपादन करताना भारताचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग म्हणतात ''या अमूल्य मनुष्यबळाचा, त्यातील प्रज्ञेचा आपण सार्थ अभिमान बाळगून, स्पर्धात्मक युगात आपला उत्कर्ष करणे आवश्यक व अपरिहार्य आहे.''औद्योगिक क्रांतीमुळे मनुष्यबळाबरोबर यांत्रिक शक्तीचा उपयोग होवू लागला. तथापि, यांत्रिक शक्ती ही मूलत: मानवनिर्मित शक्तीच आहे. मानवाने नैसर्गिक मूलभूत स्त्रोतांचा उपयोग करुन यंत्र व यांत्रिक शक्ती यांची निर्मिती केली. तसेच, आपल्या बुध्दिमत्तेच्या बळावर या नैसर्गिक मूलभूत स्त्रोतांचा उपयोग निर्मिती आणि सेवा क्षेत्रामध्ये व एकूणच सामाजिक उत्कर्षासाठी केला. या उत्कर्षाच्या मुळाशी मानवी शक्ती प्रामुख्याने आहे, हे जगदमान्य सत्य कोणालाही नाकारता येणार नाही. त्यामुळे मनुष्यबळाचा सुयोग्य विकास होवून त्यातून निर्माण होणाऱ्या उर्जेचा उत्पादन व सेवा क्षेत्रात कमाल व दर्जेदार वापर करता यावा म्हणून विविध प्रकारचे सुमारे ५५ ते ६० कामगार व औद्योगिक कायदे शासनाने केले आहेत. हे सर्व कायदे कामगारांना संरक्षण देणारे आहेत. हे मूलत: लक्षात घेतले पाहिजे. त्यामध्ये कामगारांची वैयक्तिक व सामाजिक सुरक्षा हा महत्वाचा घटक विचारात घेवून तरतुदी केल्या आहेत. आजच्या संगणक युगामध्ये जग अत्यंत जवळ आले आहे. अतिशय वेगाने आणि गतीने कामे व संवाद होवू लागले. त्यासाठी संगणक आणि संगणकीय प्रणालीचा प्रामुख्याने उपयोग करण्यात येत आहे आणि तो वाढतही जाणार आहे. आजच्या घटकेला हे कोणीही नाकारु शकणार नाही. तथापि, संगणक ही मानव निर्मिती आहे आणि या संगणकाद्वारे आदानप्रदान करण्यात येणाऱ्या माहितीचा तपशिल संगणकामध्ये मानवाद्वारेच भरला जातो. कारण संगणकास नैसर्गिक भावना व मनोव्यापाराचा निसर्गदत्त ठेवा प्राप्त झालेला नाही. किंबहुना तो होणारही नाही.

मनुष्यबळ हा घटक मुलभूत आहे. तो घटक जर परिपूर्ण असेल तरच विकास झपाट्याने होईल. मनुष्यबळ म्हणजे फक्त त्याची कार्यक्षमता का? तर, याचे उत्तर एकमेव नाही असे आहे. कारण मानवी मनाचे विश्लेषण करणे अनाकलनीय आहे. म्हणून कामगार कल्याण या विषयाला हात घालताना कामगार या संज्ञेत येणाऱ्या मानवाचे सर्वांगाने कल्याण करणे हा मूलभूत उद्देश आहे.फक्त आर्थिकदृष्ट्या त्याचा उत्कर्ष असा संकुचित विचार न करता त्याची गुणवत्ता, कार्यक्षमता, सामाजिक दर्जा या वाढीबरोबर त्यास कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक स्वास्थ्य, स्थैर्य कसे लाभेल या सर्व सूक्ष्म, परंतु त्याच्या आयुष्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचा विचार करणे अनिवार्य आहे. या घटकांचा विचार करताना त्याच्या मनामध्ये चालू असलेला मनोव्यापार, त्यातुन त्याची प्रगल्भ होत जाणारी प्रज्ञा आणि त्याच्यामध्ये असणारा नैसर्गिक मूलभूत उर्जा स्त्रोत यांचा अनन्य साधारण समन्वय साधून, ही त्याची प्रज्ञा, त्याच्यामधील उर्जेद्वारे उत्तम दर्जाचे कार्य करण्यासाठी परावर्तित करणे, यालाच मूलत: कामगार कल्याण असे संबोधण्यात येते.

कामगार कल्याण म्हणजे कामगारांचा चौफेर उत्कर्ष करणे, त्यामध्ये प्रामुख्याने त्याची कार्यक्षमता वाढविणे आणि ही कार्यक्षमता वाढविण्यासाठी तो प्रथमत: ज्यासाठी हे काम करीत आहे, त्या त्याच्या कुटुंबामध्ये त्याला मानसिक आणि आर्थिक स्थैर्य प्राप्त होणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्याची शारिरीक स्थिती आरोग्यदायी राहून, त्याची निर्मितीक्षमता उत्तरोत्तर वाढत जाईल, याची दक्षता व्यवस्थापनाने प्रत्येक स्तरावर घेणे आवश्यक आहे. कामगारांनी आपले काम करीत असताना केलेली स्फूर्तीदायी विशेष कामगिरी, अभिनव कल्पना राबवून संशोधनात्मक केलेला यशस्वी प्रयोग, इ. बाबींची दखल घेवून,त्या कृतीबद्दल त्याच्या पाठीवर शाबासकीची थाप मारणे नितांत गरजेचे आहे. त्यामुळे तो दुप्पट जोमाने पुढील कामास प्रवृत्त होतो. कामगाराला आपल्या कामामध्ये येणारे अनुभव आणि त्यातून मिळणारे त्याच्या अनुभवाचे ज्ञान हे सर्वश्रेष्ठ ज्ञान असते. हे मान्य करुन त्याच्या क्षेत्रातील तो अत्यंत निष्णात आणि योग्य व्यक्ती आहे, याची वारंवार त्यास जाणीव करुन देणे आवश्यक आहे. त्यासाठी दर वेळी आर्थिक मोबदला दिला पाहिजे, अशी मुळीच अपेक्षा कामगारांची नसते. आपल्याला काम करताना येणाऱ्या अडचणी, अनुभव आणि त्यांची फलनिष्पत्ती या दृष्टीने कामगारांनी एखादी विधायक, मूलभूत सूचना केली तर तिचेही स्वागत व्यवस्थापनाने वेळीच करणे ही स्तुत्य परंतु साधी कृती कामगार कल्याणामध्ये येते. कामगार कल्याण म्हणजे फक्त कामगाराला संरक्षण देणे एवढाच मर्यादित हेतू नसून, व्यवस्थापनाने आपल्या मर्यादित राहून कामगारांच्या कौटुंबिक, भावनिक, वैचारिक अशा सर्व प्रकारच्या गरजांची पूर्तता करणे ही संकल्पना यामागे आहे. प्रत्येक कामगाराला आपल्या वरिष्ठांशी सहजासहजी सुसंवाद साधण्याच्या संधी उपलब्ध करुन देणे, त्यांच्या अडचणी, गरजा आणि त्यांनी केलेल्या वैधानिक सूचनांची दखल घेवून, त्यातील योग्य त्यांची अंमलबजावणी वेळीच करणे, प्रत्यक्ष कृतीद्वारे कामगारांना प्रोत्साहन देणे, हे कोणत्याही संस्थेमधील अत्यंत आरोग्यदायी वातावरणाचे लक्षण समजले जाते आणि यालाच कामगार कल्याण म्हणतात. उलटपक्षी यापेक्षा कामगार कल्याण वेगळे असतच नाही.

# कामगार प्रशिक्षण वर्ग प्रशिक्षणार्थींना डॉ बाबा आढाव यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप



सल्लागार (कामगार) कार्यालयामार्फत नुकतेच कामगार प्रशिक्षण वर्ग ६९ व ७० चे आयोजन करण्यात आले होते. दिनांक ५/१/०८ रोजी कॅ. वडके हॉल येथे वर्गातील प्रशिक्षणार्थींना डॉ. बाबा आढाव, जेष्ठ कामगार नेते यांच्या अध्यक्षतेखाली व मा. बापूसाहेब पठारे, अध्यक्ष, स्थायी समिती व डॉ. पी.पी. जोशी, संचालक, केंद्रीय कामगार शिक्षण मंडळ, पुणे यांच्या प्रमुख उपस्थित झालेल्या समारंभात प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. वर्गाच्या अंतिम सत्रात घेण्यात आलेल्या १०० गुणांच्या परीक्षेत १ ते ३ क्रमांक प्राप्त केलेल्या पुढील प्रशिक्षणार्थींचा सत्कार करण्यात आला. वर्ग क्र. ६९- प्रथम क्र. श्री. गोकुळदास कांबळे (गुण ८०), द्वितीय क्रमांक श्री. धनाजी खामकर (गुण ७६), तृतीय क्रमांक श्री. बन्सी काटे (गुण ७५) वर्ग क्र. ७०- प्रथम क्रमांक विभागून श्री. राम सावंत व श्री. विनयकुमार आडेप (गुण ८३), द्वितीय क्रमांक श्री. विजय शहा (गुण ८२), तृतीय क्रमांक विभागून श्री. अयूबखान पठाण व श्री. दिलीप जाधव (गुण ८१). प्रशिक्षण वर्ग व सहल यशस्वी करण्यामध्ये सहभागी असलेले पंच कमिटीचे सदस्य व सौ.तनुजा रावळ आणि श्री.अशोक शिरसाट यांचाही या प्रसंगी सत्कार करण्यात आला.

समारंभामध्ये प्रशिक्षणार्थींनी वर्गात आयोजित करण्यात आलेली व्याख्याने, व्यावसायिक आस्थापनांना दिलेल्या भेटी व शैक्षणिक सहलीबद्दलचे अनुभव व्यक्त केले. विशेषत: श्री. महादेव जाधव यांनी शीघ्र काव्य रचून गायनातून अनुभव सादर केले. श्री. पांडुरंग सावंत, सरचिटणीस, श्री. तुकाराम जगताप, अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन व डॉ. पी.पी. जोशी, संचालक, केंद्रीय कामगार शिक्षण मंडळ, पुणे यांनी मार्गदर्शन केले. समारंभाचे प्रमुख पाहुणे मा. बापूसाहेब पठारे, अध्यक्ष, स्थायी समिती यांनी उपक्रमाची प्रशंसा केली व सहकार्य करण्याचे मान्य केले. डॉ. बाबा आढाव यांनी अध्यक्षीय भाषणात प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना नवीन सामाजिक सुरक्षितता कायद्याबाबत माहिती देवून त्यांना पुणे शहरातील नागरिकांबाबत असलेल्या जबाबदारीची जाणीव करुन दिली.

समारंभाचे प्रास्ताविक कामगार कल्याणाधिकारी श्री. अरुण खिलारी यांनी केले. सूत्रसंचालन श्री. जयवंत शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन कामगार शिक्षक श्री. श्रीकृष्ण घरडे यांनी केले.

•••

## सर्वोत्कृष्ट अभियंता २००७



कॉन्स्ट्रो अर्थात पुणे कन्स्ट्रक्शन ॲण्ड इंजिनिअरिंग रिसर्च फौंडेशन ही बांधकाम क्षेत्रासाठी साहित्य, मशिनरी निर्मिती आणि बांधकाम तंत्रज्ञान संशोधन करणारी अग्रेसर संस्था आहे. या पुण्यातील अग्रगण्य संस्थेमार्फत सन १९८५ पासून कॉन्स्ट्रो या नावाने प्रतिवर्षी प्रदर्शन आयोजित करण्यात येते. सन २००७ मध्ये या संस्थेमार्फत भरविण्यात आलेल्या कॉन्स्ट्रो प्रदर्शनाच्या उद्‍घाटन प्रसंगी या संस्थेमार्फत पुणे महानगरपालिकेचे कार्यक्षम विकास अभियंता श्री. माधव लाटकर यांची सर्वोत्कृष्ट अभियंता २००७ म्हणून निवड झाल्याने त्यांचा गौरव मा. डॉ. नितीन करीर, विभागीय आयुक्त, पुणे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व मानपत्र देवून करण्यात आला. सदर कार्यक्रमास बँक ऑफ महाराष्ट्रचे मुख्य कार्यकारी संचालक मा. एम.डी.मल्या हे उपस्थित होते. श्री. लाटकर यांनी पुणे महानगरपालिकेच्या अभियंता विभागात विविध विभागात व पदांवर उत्कृष्ट काम केलेले आहे. त्याची नोंद घेवून सदर संस्थेने त्यांच्या केलेल्या या गौरवाबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन सर्व स्तरातून होत आहे.

## सहृदय आभार

कामगार कल्याण निधीमार्फत दिनांक २३ ते ३० डिसेंबर, ०७ या कालावधीत विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा पं.नेहरु स्टेडियम, कै.अरुणकुमार वैद्य स्टेडियम, मामासाहेब मोहोळ संकुल, स.प.महाविद्यालय व सणस स्पोर्टस मैदान व क्लब येथे संपन्न झाल्या. या स्पर्धांच्या आयोजनामध्ये प्रत्येक क्रीडा प्रकारासाठी नियुक्त करण्यात आलेले समन्वयक, क्रीडा असोसिएशनचे पदाधिकारी, उद्‍घाटन समारंभास उपस्थित विविध क्रीडा प्रकारात नैपुण्य मिळविलेले खेळाडू व प्रमुख पाहुणे, नेहरु स्टेडियमचे व्यवस्थापक मा. सुभाष पुरी, नेहरु स्टेडियम व सल्लागार (कामगार) कार्यालयाकडील सेवकवर्गाच्या भरीव सहकार्याचा प्रमुख वाटा होता.या सर्वांकडून भविष्यकाळात याच सहकार्याची अपेक्षा, कामगार कल्याण निधीमार्फत सर्वांचे हार्दिक आभार.

# श्री.शैलेंद्र चव्हाण यांचे हस्ते कॅरम स्पर्धेस सुरुवात



कामगार कल्याण निधींतर्गत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवामध्ये दिनांक २७ व २८ डिसेंबर, ०७ रोजी पं. नेहरु स्टेडियम येथे कॅरम स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विविध विभागाकडील एकूण ४२ सेवकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ दिनांक २७/१२/०७ रोजी सकाळी ९ वाजता राष्ट्रीय खेळाडू श्री. शैलेंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.श्री.शैलेंद्र चव्हाण यांनी सहभागी स्पर्धकांबरोबर स्वत: खेळून स्पर्धेस सुरुवात केली. विविध स्पर्धांमध्ये अजिंक्यपद मिळविले ते राष्ट्रीय खेळाडू उपस्थित असल्यामुळे सहभागी स्पर्धकांचा उत्साह द्विगुणित झाला. या स्पर्धेमध्ये व्हेईकल डेपो विभागाकडील श्री. बाळू गायकवाड यांनी अजिंक्यपद मिळविले. टिळकरोड क्षेत्रीय कार्यालयाकडील श्री. राजेश शिकोत्रे यांनी उप विजेतेपद मिळविले.

****

# जगताप व भाडळे टेबल टेनिसमध्ये दुहेरी विजेते



कामगार कल्याण निधीमार्फत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवांतर्गत दिनांक २९/१२/२००७ रोजी सकाळी ९ पासून सणस स्पोर्टस् क्लब येथे टेबल टेनिस स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे औपचारिक उद्घाटन मा. सुबोध देशपांडे यांचे हस्ते करण्यात आले. या प्रसंगी श्री. नंदकुमार जगताप यांनी प्रमुख पाहुण्यांचा अल्प परिचय करुन दिला. तसेच, मा. नंदकिशोर जगताप यांनी पुष्पगुच्छ देवून प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. या स्पर्धेमध्ये एकूण १६ खेळाडूंनी सहभाग घेतला. ही स्पर्धा एकेरी व दुहेरी अशा दोन स्तरांवर घेण्यात आली. एकेरीमध्ये श्री. नंदकुमार जगताप यांनी प्रथम क्रमांक मिळविला व श्री. रविंद्र भाडळे यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला. दुहेरी स्पर्धेमध्ये श्री. जगताप नंदकुमार व सुभाष शेवाळे या जोडीने प्रथम क्रमांक मिळविला व भाडळे रविंद्र व राजपाठक यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला. या स्पर्धेमध्ये श्रीमती मंजुषा इधाटे, अभियोजक या एकमेव महिला खेळाडू सहभागी झाल्या होत्या.

•••

# जलतरण स्पर्धांचा पहिल्यांदाच समावेश



कामगार कल्याण निधीमार्फत आयोजित क्रीडा महोत्सवामध्ये पहिल्यांदाच १०० मिटर फ्री स्टाईल पोहण्याच्या स्पर्धेचा समावेश करण्यात आला होता. सदर स्पर्धा दिनांक २९/१२/०८ रोजी सकाळी १० वाजता स.प.महाविद्यालयाच्या आवारातील जलतरण तलावामध्ये पार पडली. सदर स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास कु. निधी शेलार प्रमुख पाहुणी म्हणून उपस्थित होती. यावेळी कु. निधी शेलार आणि पोहण्याच्या स्पर्धेच्या आयोजनास सहकार्य केल्याबद्दल श्री. सुभाष बोधे आणि श्रीमती गाडगीळ यांचा, श्री. नंदकिशोर जगताप, सचिव, कामगार कल्याण निधी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. सदर स्पर्धेमध्ये एकूण २२ सेवकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धा ४० वर्षांवरील व खुला गट अशा दोन गटात घेण्यात आल्या. खुल्या गटामध्ये श्री. विशाल बोरकर यांनी प्रथम क्रमांक तर श्री. दिलीप ढगळे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. ४० वर्षांवरील स्पर्धेमध्ये श्री. राजाराम केदारी यांनी प्रथम क्रमांक व श्री. आनंद तारु यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

# संगित खुर्ची व थ्रो बॉल स्पर्धेस महिलांचा सहभाग

कामगार कल्याण निधीमार्फत दिनांक २९/१२/०७ रोजी पं. नेहरु स्टेडियम येथे फक्त महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या संगित खुर्ची व थ्रो बॉल स्पर्धेस महिला सभासद सेवकांचा अत्यल्प प्रतिसाद लाभला. थ्रो बॉल स्पर्धेमध्ये १० महिलांनी सहभाग घेतला होता. यापैकी प्रथम क्रमांक श्रीमती अमृता विठ्ठल गवते व द्वितीय क्रमांक सौ.अरुणा महेंद्र जाधव यांना मिळाला. संगित खुर्चीमध्ये या १० महिलांनी सहभाग घेतला होता. संगित खुर्चीमध्ये सहभागी स्पर्धकांपैकी सौ. शैला बबन चव्हाण यांना प्रथम क्रमांक व श्रीमती भाग्यश्री दिगंबर जोशी यांना द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. या स्पर्धांचे समन्वयक म्हणून सौ. सुप्रिया परदेशी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# १०० मिटर धावणे व लांब उडीमध्ये उत्स्फूर्त सहभाग



क्रीडा महोत्सवाच्या अनुषंगाने दिनांक २९/१२/०७ रोजी सणस स्पोर्टस् मैदान येथे १०० मिटर धावणे आणि लांब उडी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. लांब उडी या स्पर्धेचा समावेश प्रथमत:च करण्यात आला होता. या स्पर्धेमध्ये अनुक्रमे ३८आणि २२ खेळाडू उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. १०० मिटर धावण्याच्या स्पर्धेसाठी तीन गट वयानुसार करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये वय वर्ष १८ ते ३० या गटामध्ये श्री. राहुल माळी यांनी प्रथम क्रमांक तर श्री. सचिन शेलार यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. वय वर्ष ३१ ते ४५ या गटातून प्रथम क्रमांक श्री. विजय पिंजन तर द्वितीय क्रमांक श्री. अनंत टोले यांनी प्राप्त केला. वर्ष ४६ ते ६० या गटामध्ये श्री. अविनाश पंढरी यांनी प्रथम क्रमांक व श्री. राजेंद्र पत्तीवार यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेमध्ये पुणे जिल्हा हौशी अथलॅटिक संघटनेचे पदाधिकारी (श्री. अकोटकर, श्री. हिरेमठ व श्रीमती गुरुबन्स कौर) यांनी पंच म्हणून काम पाहिले.

लांब उडी स्पर्धेसाठी तीन गट वयानुसार करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये वय वर्ष १८ ते ३० या गटामध्ये श्री. संदिप पाटोळे यांनी प्रथम क्रमांक तर श्री. सचिन शेलार यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. वय वर्ष ३१ ते ४५ या गटातून प्रथम क्रमांक श्री. लक्ष्मीकांत शिंदे तर द्वितीय क्रमांक श्री. निलेश चव्हाण यांनी प्राप्त केला. तिसऱ्या वय वर्ष ४६ ते ६० या गटामध्ये श्री. अविनाश पंढरी यांनी प्रथम क्रमांक व श्री. राजेंद्र पत्तीवार यांनी द्वितीय क्रमांक पटकावला.

# तिळगुळ समारंभ

मकरसंक्रांतीनिमित्त परस्परांमधील मतभेद विसरुन सामंजस्य वाढीस लागण्यासाठी घोलेरोड, औंध व येरवडा क्षेत्रीय कार्यालयांतर्गत हजेरी कोठ्यांवर तिळगुळ वाटप समारंभ सल्लागार (कामगार) कार्यालयाच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आले होते.

# श्री.बत्तुल यांचे प्रसंगावधान

दिनांक १३/९/२००७ रोजी शंकरशेट रोड, एसटीने केलेल्या अपघात प्रसंगी श्रीमती अनिता विनायक बोरगावकर यांचा पाय एसटीच्या चाकाखाली अडकला होता. या वेळी अग्निशामक दलाकडील जवान श्री.अंबरिश दत्तात्रय बत्तुल यांनी वेळीच प्रसंगावधान दाखवून सदर महिलेस वेळीच औषधोपचार केल्यामुळे त्या महिलेचे प्राण वाचले.

श्री. बत्तुल यांचे काम अनुकरणीय असून, त्याची विशेष दखल खात्यातर्फे घेण्यात येवून दिनांक ३१/१/२००८ रोजी त्यांचा विशेष सत्कार आयोजित करण्यात आला आहे.

## ४१ सेवानिवृत्तांची सेवापूर्ती



डिसेंबर २००७ मध्ये मनपाच्या सेवेतून एकूण ४१ सेवक सेवानिवृत्त झाले. त्यामध्ये वयोपरत्वे २७ व ऐच्छिक सेवानिवृत्ती घेतलेले १४ सेवक होते. या सेवकांचा सेवापूर्ती समारंभ दिनांक ३१/१२/०७ रोजी कै. वडके हॉल येथे आयोजित करण्यात आला होता. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून मा.सुधीर खानापुरे, अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) उपस्थित होते. शिवाय नगर अभियंता श्री.प्रशांत वाघमारे, विकास अभियंता श्री.माधव लाटकर व सल्लागार (कामगार) श्री.नंदकिशोर जगताप उपस्थित होते. सेवापूर्ती झालेल्या सेवकांना शाल व स्मृतीचिन्ह प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देवून गौरविण्यात आले. मा.श्री.नंदकिशोर जगताप यांनी सेवानिवृत्त सेवक व त्यांच्या कुटुंबियांना सेवानिवृत्तीनंतरचे आनंदी जीवनाबाबत मार्गदर्शन केले. तसेच, प्रमुख पाहुणे मा.सुधीर खानापुरे यांनी सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या पुंजीच्या बचतीबाबत मार्गदर्शन केले.

या समारंभात महापालिकेस वर्ल्ड लिडरशिप फोरम संस्थेतर्फे ऑटोडीसीआर या संगणकीय प्रणालीसाठी मिळालेल्या प्रथम क्रमांकाप्रित्यर्थ मा.प्रशांत वाघमारे, नगर अभियंता व विनोद क्षिरसागर, सहाय्यक अभियंता यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच, कॉन्स्ट्रो २००७ च्या उद्घाटन प्रसंगी सर्वोत्कृष्ट अभियंता म्हणून गौरविण्यात आलेले मा.माधव लाटकर यांचाही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.जयवंत शिंदे व आभार प्रदर्शन श्री.सचिन जाधव यांनी केले.

## राष्ट्रीय योगासन स्पर्धेत मनपा विद्यार्थ्यांचे यश

दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय योगासन स्पर्धेत पुणे मनपाच्या डॉ. वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यानिकेतनमधील विद्यार्थी सागर नलावडे १७ वर्षे व कमलेश झा १९ वर्षे वयोगटात द्वितीय क्रमांक मिळविले. या यशाप्रित्यर्थ त्यांचा प्रशस्तीपत्रक व स्मृतीचिन्हे देवून सत्कार करण्यात आला. या विद्यार्थ्यांना प्रशालेतील क्रीडा शिक्षिका श्रीमती आसावरी गुमास्ते, श्री.बी.एम.माळी व शाळाप्रमुख श्री.सी.डी.पानसरे यांनी मार्गदर्शन केले. वरील दोन्ही विद्यार्थी आणि त्यांच्या यशास हातभार लावणारे मार्गदर्शक प्रशिक्षक यांचे विशेष अभिनंदन. त्यांचे कौतुक सर्वत्र करण्यात येत आहे.

## कुस्ती स्पर्धा मामासाहेब मोहोळ संकुलात संपन्न



कामगार कल्याण निधीमार्फत कामगारांसाठी आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धांतर्गत कुस्ती स्पर्धांचे आयोजन दिनांक २८/१२/०७ रोजी मामासाहेब मोहोळ संकुल, कात्रज येथे करण्यात आले होते. या स्पर्धांसाठी श्री. अमोल बुचडे, महाराष्ट्र केसरी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच, या कार्यक्रमास मा. चंद्रकांत उर्फ अप्पासाहेब अमराळे, माजी नगरसेवक हजर होते. या स्पर्धेसाठी उपस्थित असलेल्या दोन्ही प्रमुख पाहुण्यांचे मा. नंदकिशोर जगताप, सचिव, कामगार कल्याण निधी यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. या कुस्ती स्पर्धा ५ गटांमधून घेण्यात आल्या. ६० किलो श्री. दिलीप कवितके विजयी विरुध्द श्री. विजय जावळकर, ६६ ते ७४ किलो श्री. भगवान बराटे विजयी विरुध्द श्री.काळूराम लोखंडे, ८५ किलो श्री. हणुमंत नांगरे विजयी विरुध्द श्री. प्रशांत जोरी, ९६ किलो श्री. नामदेव भोसले विजयी विरुध्द श्री.शांताराम करंजावणे व १२० किलो श्री. शुक्राचार्य वांजळे विजयी विरुध्द श्री. विजय इंगवले. या स्पर्धेमध्ये श्री.संदीप वांजळे यांनी पंच म्हणून काम पाहिले. या स्पर्धेच्या आयोजनासाठी अखिल भारतीय कुस्तीगीर महासंघ यांच्या पदाधिकारी व हिंदकेसरी श्री.योगेश दोडके यांनी विशेष व बहुमोल सहकार्य केले. त्यांच्यामुळेच या स्पर्धा यशस्वी झाल्या.

**कल्याणवार्ता**
**जानेवारी, २००८**
❖ **प्रकाशक तथा अध्यक्ष** ❖
**कामगार कल्याण निधी**
**मा. प्रविणसिंह परदेशी**
आयुक्त, पुणे महापालिका
❖ **संपादक** ❖
मा. नंदकिशोर जगताप
सल्लागार (कामगार)
❖ **कार्यकारी संपादक** ❖
लीलाधर प्र.वाबळे
समन्वयक, मनुष्यबळ विकास कक्ष
तथा कार्यालय अधिक्षक
❖ **सहाय्यक** ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ **मुद्रक** ❖
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ **प्रकाशन स्थळ** ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ **संपर्क** ❖
सल्लागार (कामगार) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५५/
१२५२/१२५३
ईमेल आयडी
nandkumar.jagtap
@punecorporation.org
**फक्त खाजगी वितरणासाठी**
(विनामूल्य)

## क्रिकेटमध्ये अग्निशामक-पाणीपुरवठा विजेते

कामगार कल्याण निधींतर्गत आयोजित करण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धा दिनांक २६ ते २८ डिसेंबर, ०७ या कालावधीत पं.नेहरु स्टेडियम येथे पार पडल्या. या स्पर्धांमध्ये एकूण ८ संघ सहभागी झाले होते. या स्पर्धा एकूण १६ षटकांच्या खेळविण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये येरवडा/संगमवाडी आणि पाणीपुरवठा/अग्निशामक दल या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघाचा पराभव करुन अंतिम फेरी गाठली. अंतिम क्रिकेट सामना दिनांक २५ जानेवारी, ०८ रोजी पं. नेहरु स्टेडियम येथे संपन्न झाला. या सामन्यामध्ये अग्निशामक-पाणीपुरवठा या संघाने विजय प्राप्त करुन अजिंक्यपद मिळविले. या सामन्यांमध्ये श्री. बाबू सर, श्री. शेख सर, सर्वश्री निलेश चव्हाण, देवदत्त देवकर, जितेंद्र बागे, भाउ कदम व लक्ष्मीकांत शिंदे यांनी पंच म्हणून काम पाहिले. या सामन्यांच्या यशस्वी आयोजनामध्ये नियुक्त समन्वयक यांनी मोलाची मदत केली. तर स्पर्धांच्या यशस्वी आयोजनात व्यवस्थापक, पं. नेहरु स्टेडियम, मा. सुभाष पुरी यांचा सिंहाचा वाटा तर त्यांच्या सहकाऱ्यांचे परिश्रम होते.

## कबड्डी स्पर्धा

कल्याण निधींतर्गत आयोजित स्पर्धांतर्गत दिनांक ३०/१२/०७ रोजी कै.अरुणकुमार वैद्य स्टेडियम येथे कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांचे उद्घाटन मा.नाना भानगिरे, सदस्य, पुणे मनपा यांच्या हस्ते पार पडले. या प्रसंगी श्रीमती संगिता सोनवणे, श्री. छत्रपती पुरस्कार विजेत्या या मनपा सेविका प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. पाहुण्यांचे स्वागत व सत्कार मा.नंदकिशोर जगताप यांनी पुष्पगुच्छ देवून केले. या स्पर्धेमध्ये ४ संघ सहभागी झाले, या स्पर्धा बाद पध्दतीने घेण्यात आल्या. अग्निशामक दल आणि सुरक्षा विभाग या दोन उपविजेत्या संघात अंतिम सामना खेळविण्यात आला. सदर सामना काही अपरिहार्य कारणास्तव रद्द करण्यात आला. रद्द झालेला अंतिम सामना पुन्हा घेण्यात येणार आहे.

## पांडित्य पुरस्कार



जीवनात अनेक अडचणी, संकटांना सामोरे जावून क्रीडा, सामाजिक आणि शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, इंग्रजी, मराठी आणि हिंदी लघुलेखनाचे प्रशिक्षण देवून हजारो विद्यार्थ्यांना स्वावलंबी केल्याबद्दल मनपाचे वरिष्ठ लघुलेखक श्री.विनोद पुरंदरे यांना देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेमार्फत, दि. ६/१/०८ रोजी पांडित्य पुरस्कार देवून गौरविण्यात आले आहे.त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

## अग्निशामक दल व्हॉलिबॉल विजेते



कामगार कल्याण निधींतर्गत आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धांतर्गत दिनांक ३०/१२/०७ रोजी कै.अरुणकुमार वैद्य स्टेडियम येथे व्हॉलिबॉल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या उद्घाटनास मा.नाना भानगिरे, सभासद, पुणे मनपा व मा. दत्ता मोरे, सचिव, पुणे जिल्हा व्हॉलिबॉल संघटना हे उपस्थित होते. व्हॉलिबॉल स्पर्धेमध्ये ३ संघ सहभागी झाले होते. या स्पर्धा बाद फेरीनुसार घेण्यात आल्या. अंतिम सामना अग्निशामक दल आणि घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय यांच्यामध्ये खेळविण्यात आला. या सामन्यात अग्निशामक दलाने विजेतेपद संपादन केले. घोलेरोड क्षेत्रीय कार्यालयास उपविजेतेपद मिळाले. या स्पर्धेमध्ये पुणे जिल्हा व्हॉलिबॉल संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पंच म्हणून काम पाहिले.